महावितरण

# महावितरण विद्युत वार्ता

■ वर्ष:१८ ■ अंक: ७ ■ नोव्हेंबर २०२३ ■ पाने: ८

# ग्राहकाभिमुख सेवा, पारदर्शी मूल्यमापन

## हितगूज



**श्री. लोकेश चंद्र**
**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी ट्रान्सफॉर्मर जळाला अथवा बिघडल्यास त्या जागी लवकरात लवकर दुरुस्त ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे निर्देश महावितरणला दिले आहेत. त्यानुसार महावितरणने मोहीम हाती घेतली आहे. मोठ्या प्रमाणात ऑईलची उपलब्धता, ट्रान्सफॉर्मर दुरुस्तीची व्यवस्था आणि या मोहिमेवर मुख्यालयातून देखरेख ठेऊन नियंत्रण अशी उपाययोजना केली आहे. आता ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त झाल्याची खबर मिळाल्यानंतर कमाल तीन दिवसात त्या जागी दुरुस्त ट्रान्सफॉर्मर बसविला जात आहे. नादुरुस्त ट्रान्सफॉर्मर बदलण्याच्या मोहिमेला यश आले आहे. तथापि, एक समस्या जाणवली. ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त झाल्याची खबर मिळण्यास विलंब झाला तर आपण झटपट ट्रान्सफॉर्मर बदलला तरीही प्रत्यक्षात वीज पुरवठा पुन्हा सुरू होण्यास विलंब होतो. यामुळे महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एम्प्लॉई मित्र ॲपवरून ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त झाल्याची माहिती वेळीच कळविणे गरजेचे आहे. तसेच लाईनमन आणि फिल्ड स्टाफनेही वेळीच ट्रान्सफॉर्मरबद्दल माहिती अद्यावत करणे आवश्यक आहे. वीज ग्राहकांना ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त झाल्याची खबर थेट महावितरणला देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. याबाबतची खबर ग्राहकांनी १८०० २१२ ३४३५ किंवा १८०० २३३ ३४३५ या टोल फ्री क्रमांकावर कळवावी किंवा मंडलस्तरावरील कार्यकारी अभियंत्यास कळवावी, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे. तसेच महावितरणच्या ॲपवरूनही ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त झाल्याची खबर देण्याची सुविधा उपलब्ध आहे. याबाबतीत मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी दिलेली आहे. या सुविधेचा वापर करून वीज ग्राहकांकडून मिळणारी माहिती आणि त्यानुसार केलेली कारवाई यावरही मुख्यालयातून नियमित देखरेख ठेवण्यात येत आहे. मला खात्री आहे की, वीज ग्राहकांच्या सहकार्याने आपण ही मोहीम यशस्वी करू.

ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त होणे हा एक संवेदनशील विषय असून यामुळे आपल्याला ग्राहकांच्या रोषाचा सामना करावा लागतो. आपण हाती घेतलेल्या मोहिमेला कायमस्वरूपी व्यवस्थेत रुपांतरित करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी ट्रान्सफॉर्मरची इन्व्हेंटरी अचूक असायला हवी. मुख्य अभियंत्यांनी फिल्टर युनिट व ट्रान्सफॉर्मर दुरुस्ती एजन्सीच्या स्थळांवर जाऊन पाहणी करावी. जे ट्रान्सफॉर्मर कालबाह्य झालेले आहेत, त्यांना परवानगी घेऊन भंगारात काढावे. ज्या एजन्सी ट्रान्सफॉर्मर दुरुस्तीचे काम योग्य प्रकारे वेळेत पूर्ण करत नाहीत, अशा एजन्सीवर तात्काळ कारवाई करावी.

रब्बीच्या हंगामात ट्रान्सफॉर्मरवर क्षमतेपेक्षा अधिक भार येऊन ते जळण्याच्या घटना घडल्या. ट्रान्सफॉर्मरची समस्या सोडवून वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी आपण वचनबद्ध आहोत. त्यासोबत ट्रान्सफॉर्मरवर अधिक भार येण्याची समस्या दूर करण्यासाठीही पावले टाकण्याची गरज आहे.

### ग्राहकाभिमुख सेवेच्या आधारे कामाचे मूल्यमापन

'इज ऑफ लिव्हिंग'च्या धोरणानुसार ग्राहकांच्या सर्व प्रकारच्या अडचणी सोडवून त्यांना दर्जेदार व अखंडित वीज पुरवठा करणे ही आपली जबाबदारी आहे. त्यामुळे महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करताना ग्राहकांची सेवा हाच केंद्रबिंदू मानला आहे. मूल्यमापनासाठी निश्चित 'की रिझल्ट एरिया' (केआरए) ठरविण्यात आले आहेत. त्या आधारे कामाचे मूल्यमापन अत्यंत पारदर्शी पद्धतीने व निश्चित प्रणालीद्वारे (System generated) होणार आहे. याच्या आधारे कामगिरीचे वस्तुनिष्ठ अहवाल तयार करण्यात येतील. नवीन वीज कनेक्शन देणे, ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त होण्याचे प्रमाण, तक्रारींचे निवारण, बिलांची वसुली, निर्दोष बिलिंग, नॉन एजी सेल टार्गेट असे केआरएचे मापदंड आहेत. केआरएच्या आधारे क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या कामगिरीचे परीक्षण केले जाईल. प्रगतीचे मासिक अहवाल मुख्य अभियंत्यांच्या आढावा बैठकीत सादर केले जातील. ही नवीन प्रणाली अगदी कनिष्ठ स्तरापर्यंत लागू होणार आहे. यापुढे अशा वस्तुनिष्ठ परीक्षणावरूनच सगळ्यांचे वार्षिक गोपनीय अहवाल तयार होतील. ग्राहकांना नवीन वीज जोडण्या सहजपणे व लवकरात लवकर मिळणे आवश्यक आहे. कृती मानकाच्या आधारे (SoP) नवीन वीज जोडण्या देणे अपेक्षित आहे. त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधांची कामे हाती घेतली जातील. जर ग्राहकांनी डीडीएफचा पर्याय निवडला नसेल तर एनएससी व अन्य कोणत्याही मंजूर योजनेअंतर्गत आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करून नवीन उच्चदाब (एचटी) आणि लघुदाब (एलटी) जोडण्या अथवा लोड एक्स्टेंशन देण्यात यावे.

जिथे पायाभूत सुविधा निर्माण करण्याची गरज आहे त्या ठिकाणी पायाभूत सुविधा निर्माण झाल्याची खात्री करून व तसे अहवाल प्राप्त झाल्यानंतरच प्रणालीद्वारे जोडणी अर्जाचे फर्म कोटेशन दिले जातील. (पान २ वर)

# सुलभता व तत्पर ग्राहक सेवा हीच प्राथमिकता: संचालक श्री. योगेश गडकरी

**सेवेच्या** निर्धारित कृती मानकांप्रमाणे वीज ग्राहकांना सेवा द्यावी. सुरळीत वीजपुरवठा, नवीन वीजजोडणी, अचूक बिलिंग व तक्रारींचे वेळेत व प्राधान्याने निवारण करावे. 'इज ऑफ लिव्हिंग' संकल्पनेनुसार ग्राहकसेवेची सुलभता व तत्परता हीच प्राथमिकता असल्याने, त्यानुसार कामात अधिक सुधारणा करण्याचे निर्देश संचालक(वाणिज्य) श्री. योगेश गडकरी यांनी दिले.

कल्याण परिमंडलातील वसई आणि पालघर मंडल कार्यालयाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी वसई (पूर्व) येथे आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यालयातील देयके व महसूल विभागाचे मुख्य अभियंता श्री. संजय पाटील व कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. धनंजय औंढेकर यांची उपस्थिती होती.

संचालक(वाणिज्य) श्री. गडकरी यांनी आढावा घेताना वसई व विशेषत: पालघर मंडलात ऑक्टोबर महिन्यात वीजबिलांच्या थकबाकीत वाढ झाल्याचे निदर्शनास आणून देत चालू वीजबिलांसह थकबाकीची शंभर टक्के वसूली करण्याचे निर्देश दिले. शेतीला दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० ची वेगवान अंमलबजावणी सुरु केली असून या योजनेतील कामे युद्धस्तरावर पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. नवीन वीजजोडणी, नादुरुस्त वीजमिटर बदलणे, ग्राहकांच्या सर्व प्रकारच्या तक्रारींचे तत्पर निवारण, वीज वितरण यंत्रणेची नियमित देखभाल-दुरुस्ती, वितरण रोहित्र नादुरुस्ती व वीजगळतीचे प्रमाण आणखी कमी करण्याचे निर्देश त्यांनी उपस्थित अधिकारी व अभियंत्यांना दिले.




**आढावा बैठक घेताना संचालक(वाणिज्य) श्री. योगेश गडकरी, सोबत मान्यवर.**

या बैठकीला वसई व पालघर मंडलातील अधीक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते, उपविभागीय अभियंते यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ■

---

# ग्राहकाभिमुख सेवा, पारदर्शी मूल्यमापन

(पान १ वरून)

विज बिलांची वसुली हा महत्त्वाचा विषय आहे. उद्दिष्टाच्या तुलनेत वसुली कमी आहे. अनेक ठिकाणी सध्याची मागणीही वसूल झालेली नाही. मागणी आणि थकबाकीच्या वसुलीला वेग आला पाहिजे. शंभर टक्के चालू मागणीसह मार्च २०२३ च्या अनुषंगाने किमान ५०% थकबाकी या महिन्यात वसूल केली जावी, जेणेकरून जानेवारी २०२४ पर्यंतची थकबाकी ही मार्च-२३ च्या पातळीवर असेल.

**मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेला गती**

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेच्या कामाला आता खूप गती प्राप्त झालेली आहे. योग्य नियोजन करून याची अंमलबजावणी करावी. या योजनेशी संलग्न असणाऱ्या उपकेंद्र व संबंधित पायाभूत यंत्रणेचे सक्षमीकरण पुढील तीन महिन्याच्या आत करायचे आहे. या योजनेशी जोडलेल्या फिडरच्या देखरेखीचे काम करून ते सुस्थितीत असतील याची देखील खात्री करावी.

मोबाईल ॲपच्या माध्यमातून पैसे भरून प्रलंबीत कृषिपंप जोडणी अर्जांची व मेडाच्या पोर्टलवरील ग्रीडविरहित सौर ऊर्जा मोटर पंपांचा सर्वेक्षण येत्या ३ आठवड्यात पूर्ण करावेत. यातून पीएम कुसुम योजनेअंतर्गत किती पंपांना ग्रीडविरहित सौर पंप देऊ शकतो याची चाचपणी करावी. सध्याच्या उच्चदाब व लघुदाब वाहिनीवरून अर्जदाराचे प्रस्तावित पंपाचे स्थान किती अंतरावर आहे, याची अचूक माहिती सुद्धा नमूद करावी. ग्रीडविरहीत सौर ऊर्जा मोटर पंप आस्थापित करण्यासाठी ग्राहकांचे मोबाईल नंबर हे आधारकार्डसोबत संलग्न करावे. सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर पात्र अर्जदारांना सर्वात आधी अर्ज करणाऱ्यास प्रथम (फर्स्ट कम फर्स्ट सर्व्हड्) याच्या आधारेच फर्म कोटेशन दिले पाहिजे.

**स्मार्ट मीटरची उपयुक्तता पटवून द्या**

आरडीएसएस योजनेमुळे राज्यातील वीज यंत्रणा बळकट होणार आहे. त्यामुळे राज्यातील ग्राहकांना खात्रिशीर आणि दर्जेदार वीज पुरवठा होणार असल्याने या योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी होणे अतिशय गरजेचे आहे. आरडीएसएस योजनेअंतर्गत होणाऱ्या कामावर लक्ष केंद्रित करून गुणवत्तापूर्ण कामे झाली पाहिजेत, याची खात्री करणे ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे.

लवकरच ग्राहकांकडे स्मार्ट मीटर बसविण्यास सुरवात होईल. हे करीत असताना स्मार्ट मीटरची उपयुक्तता ग्राहकांना पटवून देणे गरजेचे आहे. त्यासाठी स्थानिक माध्यमाचा वापर करून विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात यावी. स्मार्ट मीटर लावण्यासाठी योग्य ते नियोजन करावे. आपल्याला सर्वात आधी शासकीय कार्यालयात स्मार्ट मीटर बसवायचे आहे. काढलेले जुने मीटर व्यवस्थितपणे चांगल्या ठिकाणी साठवून ठेवा. स्मार्ट मीटरिंग एजन्सीच्याद्वारे करण्यात येणाऱ्या सर्वेक्षणात थकबाकीपोटी कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित करण्यात आलेल्या ग्राहकांचीही पडताळणी प्राधान्याने करण्यात यावी. त्या प्रकरणात थकबाकी वसूल करण्याची कारवाई करावी.

**नेटवर्क प्लॅनिंगचे पुढचे पाऊल**

नेटवर्क प्लॅनिंग प्रणाली लवकरच स्थापित केली जाणार आहे. त्यासाठी मुख्य अभियंता (वितरण) द्वारे जारी केलेल्या टेम्प्लेट्सनुसार आवश्यक असलेली माहिती पुढील २ महिन्यांत सिस्टममध्ये अपलोड करण्यासाठी मोबाईल ॲपच्या माध्यमातून संकलित करणे गरजेचे आहे. हे काम आपल्याला मोहीम स्वरूपात पूर्ण करायचे आहे. नेटवर्क प्लॅनिंग टीम आधीच ठरविण्यात आलेली असून त्याला ऑपरेशनल ट्रेनिंग दिले जाईल. नेटवर्क प्लॅनिंगचे पुढचे पाऊल महावितरणच्या कामात मोठी सुधारणा घडवेल. ■

# वीजग्राहकांच्या सेवेतील हयगय खपवून घेणार नाही – संचालक श्री. संजय ताकसांडे

सर्व वर्गवारीतील वीजग्राहकांना सेवेच्या निर्धारित कृती मानकांप्रमाणे सेवा देण्यासाठी महावितरण अतिशय गंभीर आहे. त्यानुसार सुरळीत वीजपुरवठा, नवीन वीजजोडणी, अचूक बिलिंग व तक्रारींचे निराकरण यामधील तत्परतेत हयगय खपवून घेतली जाणार नाही असा इशारा संचालक(संचालन) श्री. संजय ताकसांडे यांनी पुणे येथे घेतलेल्या आढावा बैठकीत दिला.



पुणे परिमंडलातील कामांचा आढावा घेताना संचालक(संचालन) श्री. संजय ताकसांडे. सोबत मान्यवर.

पुणे परिमंडल अंतर्गत ग्राहकसेवांसह विविध मुद्द्यांवरील कामकाजाबाबत सर्व मंडल, विभाग व उपविभाग कार्यालयांचा 'प्रकाशभवन' येथे आढावा घेताना संचालक श्री. संजय ताकसांडे बोलत होते. यावेळी पुणे प्रादेशिक संचालक श्री. अंकुश नाळे, मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार (पुणे परिमंडल) व मुख्य अभियंता(देयके व महसूल) श्री. संजय पाटील यांची उपस्थिती होती.

संचालक(संचालन) श्री. संजय ताकसांडे म्हणाले की, वीजग्राहकांना 'इज ऑफ लिव्हिंग'प्रमाणे सेवा देण्यास महावितरणने अतिशय गंभीरपणे प्रारंभ केला आहे. यामध्ये कर्मचाऱ्यांची तत्परता अतिशय महत्त्वाची आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याने याची नोंद घ्यावी व त्याप्रमाणे ग्राहकांना सेवा देण्यात कोणतीही कुचराई करू नये.

संचालक श्री. ताकसांडे म्हणाले, शेतीला दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० मध्ये पुणे परिमंडलातील ५६ उपकेंद्रांची या योजनेसाठी निवड झाली आहे. ही सर्व उपकेंद्र अद्ययावत करणे, तांत्रिक दुरुस्ती व सुधारणा, स्थापत्य कामे, इतर सक्षमीकरणाचे विविध कामे युद्धपातळीवर पूर्ण करावेत.

कोटेशनची रक्कम भरलेल्या पुणे परिमंडलातील प्रलंबित कृषी वीजजोडण्या लवकरात लवकर कार्यान्वित कराव्यात. या बैठकीला अधीक्षक अभियंता श्री. अरविंद बुलबुले, श्री. युवराज जरग, श्री. संजीव राठोड यांच्यासह सर्व विभागांचे कार्यकारी अभियंता, उपविभाग कार्यालयप्रमुख अभियंता व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ■

## धाराशिव जिल्ह्यात आढावा बैठक

**'इज ऑफ लिव्हिंग'**च्या आदर्श तत्वानुसार वीज ग्राहकांना सेवा देत असताना कंपनीने निर्धारीत केलेल्या ग्राहकसेवेच्या मानकानुसार विहित वेळेत ग्राहक सेवा देणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. त्यानुसार ग्राहकाभिमूख सेवा द्यावी अन्यथा गंभीर परिणामांना सामोरे जाण्याची तयारी ठेवावी असे निर्देश महावितरणचे संचालक (संचालन) श्री. संजय ताकसांडे यांनी धाराशिव येथील बैठकीत दिले.

यावेळी मुख्य अभियंता श्री. सुंदर लटपटे, अधीक्षक अभियंता सर्वश्री मदन सांगळे, मकरंद आवळेकर, मधुकर घुमे, श्रीमती शुभांगी कटकधोंड, स्थापत्य विभागाचे अधीक्षक अभियंता श्री. मोहन काळोगे यांची प्रमुख उपस्थिती होती. घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक वर्गवारीतील प्रलंबीत वीज जोडण्या पुर्ण कराव्यात तसेच मार्च २३ अखेर बाकी असलेल्या कृषीपंपाच्या वीज जोडण्या कोणत्याही परिस्थितीत पुर्ण कराव्यात, असे निर्देश श्री. ताकसांडे यांनी दिले. ■

## सोलापूर जिल्ह्यात आढावा बैठक



वीज उपकेंद्राची पाहणी करताना संचालक (संचालन) श्री. संजय ताकसांडे.

**घरगुती** असो अथवा कृषी, सर्व प्रकारच्या वीजग्राहकांना वेळेत व नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या मुदतीत वीज जोडणी देण्यासाठी कंपनी कटिबद्ध असून, ग्राहकसेवेत व वीजबिल वसुलीत हयगय करणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांना पाठीशी न घालता थेट कारवाई करण्याचे निर्देश संचालक(संचालन) श्री. संजय ताकसांडे यांनी सोलापूर येथील आढावा बैठकीत दिले आहेत.

या बैठकीला प्रादेशिक पुणे संचालक श्री. अंकुश नाळे, मुख्य अभियंता श्री. सुनिल पावडे, प्रभारी अधीक्षक अभियंता श्री. मनोज पेठकर यांच्यासह सोलापूर मंडलातील सर्व कार्यकारी अभियंते, उपविभागीय अभियंते व इतर अधिकारी उपस्थित होते.

वीजपुरवठा व बिलिंगच्या तक्रारी सुद्धा विहित मुदतीत निकाली काढाव्यात. रोहित्र जळाल्यास ते ठराविक काळात बदलावे. 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०'मध्ये सोलापूर जिल्ह्यासाठी निविदा प्रक्रिया सुरु असून, २९ उपकेंद्रांना शंभर टक्के (९९४ एकर) तर ५० उपकेंद्रांना अंशत: (७६५ एकर) जागा मिळाल्या आहेत. अशी माहिती श्री. ताकसांडे यांनी दिली.

यावेळी श्री. ताकसांडे यांनी इंदापूर तालुक्यातील लोणी देवकर व माढा तालुक्यातील मिटकलवाडी येथील ३३/११ केव्ही वीज उपकेंद्रांची पाहणी केली. तसेच दोन्ही ठिकाणी श्री. ताकसांडे यांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले. ■

**एमएसईबी सूत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक यांनी नुकताच राज्यातील ठाणे, पालघर, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, नागपूर, वर्धा, गडचिरोली, अकोला, बुलडाणा, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या १४ जिल्ह्यांचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी लोकप्रतिनिधी यांच्या सोबत ऊर्जा विभाग अंतर्गत येणाऱ्या महावितरण, महानिर्मिती, महापारेषण, महाऊर्जा आणि विद्युत निरीक्षक विभाग या यंत्रणांचा आढावा घेतला. बैठकीला संबंधित कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी यांच्यासह अभियंते उपस्थित होते. या जिल्हावार आढावा बैठकीचा हा वृत्तांत...**

## नागपूर जिल्हा — पंतप्रधान आणि उपमुख्यमंत्र्यांच्या योजनांमुळे ऊर्जा क्षेत्राचा कायापालट

**पंतप्रधान** श्री. नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने ऊर्जा क्षेत्राच्या बळकटीसाठी राबविण्यात येणारी आरडीएसएस योजना आणि उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठीची मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या दोन योजनांमुळे राज्याच्या ऊर्जा क्षेत्राचा कायापालट होणार असून त्यांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी कसोशीने प्रयत्न करावेत, असे एमएसईबी सूत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक यांनी नागपूर येथे सांगितले.

यावेळी आमदार श्री. सुनील केदार, आमदार श्री. प्रवीण दटके, आमदार श्री. राजू पारवे, आमदार श्री. आशिष जैस्वाल, आमदार श्री. टेकचंद सावरकर, जिल्हा परिषद अध्यक्षा श्रीमती मुक्ता कोकाटे आणि जिल्हा परिषद सदस्य श्री. सलील देशमुख उपस्थित होते. तसेच महावितरणचे संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे, महानिर्मितीचे संचालक श्री. संजय मारुडकर, नागपूर प्रादेशिक कार्यालयाचे संचालक श्री. सुहास रंगारी, महानिर्मितीचे कार्यकारी संचालक श्री. पंकज सपाटे, महावितरणचे मुख्य अभियंता श्री.दिलीप दोडके, महापारेषणचे मुख्य अभियंता श्री.सतीश अणे उपस्थित होते.

श्री. विश्वास पाठक यांनी सांगितले की, काळाची पावले ओळखून पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या पाठबळाने वीज वितरण व्यवस्था सुधारण्यासाठी ४२,००० कोटी रुपयांची आरडीएसएस ही योजना राज्यात राबविण्यात येत आहे. त्यांतर्गत राज्यात ४२ हजार कोटींचे प्रकल्प राबविण्यात येत असून नागपूर जिल्ह्याचा वाटा चार हजार कोटींचा आहे. या योजनेमुळे वीज वितरण प्रणाली बळकट करणे, तूट कमी करणे आणि स्मार्ट मीटर बसविणे ही कामे करण्यात येत आहेत. त्यासोबत उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेऊन लागू केलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी सात हजार मेगावॅट सौर वीज निर्मिती करण्यात येणार आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांचा लाभ होण्यासोबतच उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा कमी होणे आणि ग्रामीण भागात तीस हजार कोटींची गुंतवणूक होणे असे लाभ आहेत. या दोन योजनांमुळे आगामी अडीच वर्षात राज्याचे ऊर्जा क्षेत्र आमुलाग्र बदलणार आहे.




स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक यांनी घेतलेल्या नागपूर जिल्हा आढावा बैठकीप्रसंगी महावितरणचे संचालक (प्रकल्प) श्री. प्रसाद रेशमे, महानिर्मितीचे संचालक श्री. संजय मारुडकर व इतर मान्यवर.

आरडीएसएस योजनेच्या अंतर्गत नागपूर शहर व जिल्ह्यातील वाढती वीज मागणी ध्यानात घेता नियमित वीज पुरवठ्यासाठी जिल्ह्यात नवीन ५३ वीज उपकेंद्रे उभारण्यात येत आहेत व ४५ उपकेंद्रांची क्षमता वाढविण्यात येत आहे. २०३० सालापर्यंत नागपूरची विजेची मागणी कशा प्रकारे वाढेल हे लक्षात घेऊन जिल्ह्यातील वीज वितरण क्षमता ११०० मेगावॅटने वाढविण्यात येत आहे, अशी माहिती मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी दिली. त्यावर नागपूर शहरातील वीज उपकेंद्रांची कामे युद्ध पातळीवर सुरू करण्याची सूचना श्री. विश्वास पाठक यांनी दिली. यावेळी प्रसाद रेशमे व संजय मारुडकर यांनी अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. ■

## वर्धा जिल्हा — ट्रान्सफॉर्मर जळाला तर हेल्पलाईनवर कळवा

**गावातील** ट्रान्सफॉर्मर जळाला तर दुरुस्तीस लागणारा विलंब ध्यानात घेता याची माहिती महावितरणला थेट कळविण्यासाठी वर्धा जिल्ह्यात हेल्पलाईनची सुविधा सुरू करा, अशी सूचना एमएसईबी होल्डिंग कंपनीचे स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक यांनी वर्धा येथे केली

यावेळी खासदार श्री. रामदास तडस, आमदार श्री. समीर कुणावार, आमदार श्री. दादाराव केचे, महावितरणचे संचालक(मानव संसाधन) श्री. अरविंद भादिकर, नागपूर प्रादेशिक कार्यालयाचे संचालक श्री. सुहास रंगारी, मुख्य अभियंता श्री. दिलीप दोडके, महापारेषणचे मुख्य अभियंता श्री. सतीश अणे व महाऊर्जाचे महाव्यवस्थापक श्री. वैभव पाथोडे उपस्थित होते.

ट्रान्सफॉर्मर जळाल्यानंतर त्या जागी दुरुस्त ट्रान्सफॉर्मर बसविण्याचा कालावधी कमी करण्यासाठी महावितरणने मोहीम राबवली आहे. तथापि,



स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक यांनी घेतलेल्या वर्धा जिल्हा आढावा बैठकीप्रसंगी आमदार श्री. समीर कुणावार, आमदार श्री. दादाराव केचे, महावितरणचे संचालक (मानव संसाधन ) श्री. अरविंद भादिकर, नागपूर प्रादेशिक कार्यालयाचे संचालक श्री. सुहास रंगारी व मुख्य अभियंता श्री. दिलीप दोडके.

ट्रान्सफॉर्मर जळाल्यानंतर त्याची माहिती यंत्रणेतून उपलब्ध होण्यास विलंब होतो व परिणामी त्या त्या ठिकाणी वीज पुरवठा पुन्हा सुरू होण्यास वेळ लागतो, अशी तक्रार लोकप्रतिनिधींनी केली. ट्रान्सफॉर्मर जळाल्याची माहिती महावितरणला तातडीने कळविणे शेतकऱ्यांना शक्य व्हावे यासाठी महावितरणने हेल्पलाईन उपलब्ध करावी, अशी मागणी त्यांनी केली. या मागणीची दखल घेऊन श्री. विश्वास पाठक यांनी मुख्य अभियंत्यांना वर्धा जिल्ह्यात ही सुविधा उपलब्ध करण्याची सूचना केली. जिल्ह्यात वीज यंत्रणा बळकट करण्यासाठी आरडीएसएस योजनेच्या अंतर्गत ९४१ कोटी रुपयांची कामे हाती घेतली आहेत. ■

अकोला व बुलडाणा जिल्हा

## श्री. देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात बदल



**बुलडाणा येथे आढावा बैठकीत मार्गदर्शन करतांना स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक. समवेत आमदार संजय रायमुलकर, संचालक(मा.सं.) श्री. अरविंद भादिकर, नागपूर प्रादेशिक संचालक श्री. सुहास रंगारी.**

**ग्रामीण,** शहर, उद्योग व शेती यांना कायमस्वरूपी व अखंडित वीज पुरवठा देण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून राज्य सरकारने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना व सुधारीत वितरण क्षेत्र योजना या सारख्या महत्वाकांक्षी योजना आणल्या आहेत. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत शेतीसाठी दिवसा वीज मिळणार असल्याने शेतकऱ्यांच्या जीवनात अमुलाग्र बदल होणार आहे. त्यामुळे या योजनांची अंमलबजावणी नियोजनबध्द पध्दतीने करण्याचे निर्देश महाराष्ट्र राज्य वीज मंडळ सूत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक मा. विश्वास पाठक यांनी दिले.

अकोला परिमंडलाअंतर्गत बुलडाणा आणि अकोला जिल्ह्यांतर्गत विद्युत क्षेत्रातील विषयांचा आढावा घेण्यासाठी दोन्ही जिल्ह्यात जिल्हा नियोजन सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बुलडाणा येथे आमदार श्री. संजय रायमुलकर, अकोला येथे जिल्हा परिषद अध्यक्षा श्रीमती संगीता अढाऊ, आमदार श्री. अमोल मिटकरी, महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद भादिकर, सूत्रधार कंपनीचे संचालक श्री. आशिष चंदाराणा, प्रादेशिक संचालक सुहास रंगारी उपस्थित होते.



**अकोला येथे आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक. समवेत जिल्हापरिषद अध्यक्षा श्रीमती संगीता अढाऊ, आमदार श्री. अमोल मिटकरी, संचालक (मासं.) श्री. अरविंद भादिकर, स्वतंत्र संचालक श्री. आशिष चंदाराणा, प्रादेशिक संचालक श्री. सुहास रंगारी व इतर मान्यवर.**

यावेळी श्री. भादिकर यांनी नादुरूस्त झालेल्या रोहित्राची तत्काळ माहिती मिळावी यासाठी रिपोर्टींग मॅकेनिझम तयार करण्यास सांगितले. तसेच आगामी काळात बसविण्यात येणाऱ्या स्मार्ट मिटरमुळे ग्राहकांना होणारे फायदे आणि सुविंधाबाबत ग्राहकांना माहिती देण्याबाबत सांगितले. ■

यवतमाळ व अमरावती जिल्हा

## आरडीएसएस योजनेमुळे वीज यंत्रणेचे बळकटीकरण



**यवतमाळ येथे आढावा बैठकीत मार्गदर्शन करतांना महाराष्ट्र राज्य वीज मंडळ सूत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक. समवेत मान्यवर.**

**सुधारित** वीज वितरण क्षेत्र (RDSS) योजनेअंतर्गत राज्यात ४२ हजार कोटी, तर अमरावती परिमंडलात ३ हजार ५७५ कोटी रूपयांची वीज यंत्रणा विस्तारीकरण व सक्षमीकरणाची कामे सुरू आहेत. त्यामुळे राज्यातील वीज यंत्रणा बळकट होणार आहे, असे प्रतिपादन स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक यांनी केले.

अमरावती परिमंडलाअंतर्गत यवतमाळ आणि अमरावती जिल्ह्यात जिल्हा नियोजन भवन येथे ऊर्जा विभागाचा आढावा घेतांना ते बोलत होते. यवतमाळ येथील बैठकीला पालकमंत्री श्री. संजय राठोड, आमदार डॉ. अशोक उईके, आमदार श्री. संजीव रेड्डी बोदकुरवार, आमदार श्री. नामदेव ससाणे, अमरावती येथील बैठकिला आमदार श्री. प्रताप अडसड, महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद भादिकर, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मैनक घोष, नागपूर विभागाचे प्रादेशिक संचालक श्री. सुहास रंगारी, मुख्य अभियंता श्री. ज्ञानेश कुलकर्णी




**अमरावती येथे आढावा बैठकीत मार्गदर्शन करतांना महाराष्ट्र राज्य वीज मंडळ सूत्रधारी कपंनीचे स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक, सोबत मान्यवर.**

उपस्थित होते. बैठकिला पालकमंत्री श्री. संजय राठोड व आमदारांनी जिल्ह्यातील व मतदार संघातील वीज सेवेबाबत चर्चा केल्यानंतर श्री. विश्वास पाठक यांनी जिल्ह्यातील वीज ग्राहक आणि लोकप्रतिनिधींच्या ऊर्जा क्षेत्राबद्दल असलेल्या सूचना, समस्या व तक्रारी गांभीर्याने समजून घेऊन त्या प्राधान्याने सोडविण्याबाबत निर्देश दिले.

यवतमाळ जिल्ह्यात २११ मेगावॅट सौर ऊर्जा निर्मितीसाठी निविदा काढण्यात आल्या आहेत. तसेच अमरावती जिल्ह्यासाठी ३७७ मेगावॅट सौर ऊर्जा निर्मितीसाठी जमीन हस्तांतर आणि कराराची प्रक्रीया सुरु आहे. यावेळी संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद भादिकर यांनी प्रलंबित वीज जोडण्या तत्काळ देण्याचे व महावितरणच्या विभागानुसार वितरण हानी कमी करण्यासाठी विशेष नियोजन करण्याचे निर्देश दिले. ■

## ठाणे जिल्हा — वीज ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्यास प्राधान्य द्या

**वीज** ग्राहक आणि लोकप्रतिनिधींच्या सेवाविषयक समस्या,तक्रारींचे प्राधान्याने निवारण करावे तसेच निर्धारित मानकाप्रमाणे तत्पर ग्राहक सेवांवर विशेष लक्ष द्यावे, असे निर्देश महाराष्ट्र राज्य वीज मंडळ सूत्रधारी कपंनीचे संचालक श्री. विश्वास पाठक यांनी वीज कंपन्यांच्या अधिकारी व अभियंत्यांना दिले. ठाणे जिल्हा अंतर्गत विद्युत क्षेत्रातील विषयांचा आढावा घेण्यासाठी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समितीच्या सभागृहात नुकतीच आयोजित करण्यात आली होती.

आमदार श्री. किसन कथोरे व आमदार श्री. संजय केळकर, संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद भादिकर व कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. चंद्रकांत डांगे उपस्थित होते. या बैठकीला भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सुनील काकडे, कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. धनंजय औंढेकर, महापारेषणचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, मेडाचे मुख्य अभियंता डी. व्ही. कुलकर्णी उपस्थित होते. ■




**ठाणे येथे आढावा बैठक घेताना स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक. सोबत मान्यवर.**

## गडचिरोली जिल्हा — वीज ग्राहकांच्या सेवेसाठी लोकप्रतिनिधींची मदत घ्यावी

**गडचिरोली** जिल्ह्यातील दुर्गम व जंगलांचा प्रदेश लक्षात घेता प्रत्येक गावातील शेवटच्या घरापर्यंत वीज ग्राहकांना सेवा देण्यासाठी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींची मदत घ्यावी, अशी सूचना स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक यांनी गडचिरोली येथे केली.

यावेळी खासदार श्री. अशोक नेते, आमदार श्री. कृष्णा गजबे, महावितरणचे मुख्य अभियंता श्री. सुनील देशपांडे आणि महापारेषणचे मुख्य अभियंता श्री. सतीश अणे उपस्थित होते.

श्री. विश्वास पाठक म्हणाले की, शेतीसाठी दिवसा वीज पुरवठा करण्याची मागणी खासदार आणि आमदार यांनी केली. शेतकऱ्यांना दिवसा सिंचनासाठी वीज पुरवठा करण्याच्या हेतूने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या योजनेला चालना दिली आहे. या योजनेत सौरऊर्जेचा वापर करून सात हजार मेगावॅट वीजनिर्मिती करण्यात येईल व त्याद्वारे शेतकऱ्यांना दिवसा भरवशाचा वीज पुरवठा केला जाईल. यापैकी साडेतीन हजार मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारणीसाठीचे टेंडर प्रसिद्ध झाले आहे.

त्यांनी सांगितले की, ऊर्जा क्षेत्राच्या सुधारणेसाठी आरडीएसएस ही योजना राबविण्यात येत आहे. त्यापैकी गडचिरोली जिल्ह्यात ८६७ कोटी रुपयांची कामे होणार आहेत. यामुळे वीज वितरणाचे जाळे बळकट होईल आणि ग्राहकांना दर्जेदार वीज पुरवठा होईल. ■




**गडचिरोली येथे आढावा बैठक घेताना स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक. सोबत मान्यवर.**

# राज्यातील विविध परिमंडलात जनजागृती

**राज्यातील अनेक ठिकाणी विद्यार्थी, नागरिक यांना वीज यंत्राणेबाबत जागरूक करण्यात आले. तसेच महावितरणच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. त्या कार्यक्रमांचा थोडक्यात वृत्तांत...**

### नाशिकच्या पिंक रन मध्ये 'विद्युत सुरक्षेचा जागर'

**नाशिक** येथे नुकत्याच पार पडलेल्या पिंक रनमध्ये महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यामध्ये धाव घेवून सहभाग नोंदविला. सोबतच विद्युत सुरक्षितता संदर्भात माहिती देत विद्युत सुरक्षेचा जागर केला.




**विद्युत सुरक्षितता संदर्भात माहिती देताना अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. जितेंद्रकुमार राठौर व उपस्थित महावितरणचे अधिकारी, कर्मचारी.**

एकत्रितपणे कॅन्सरविरुद्ध लढा ही थीम असलेल्या या स्पर्धेत १०, ५ आणि ३ कि.मी. रनमध्ये महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कुटुंबीयांसह सहभाग नोंदविला. दरम्यान विद्युत सुरक्षाबाबत फलक घेवून धाव घेण्यात आली. त्यानंतर अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. जितेंद्रकुमार राठौर यांनी ऊर्जा संवर्धन आणि विद्युत सुरक्षिततेबद्दल उपस्थिताना माहिती दिली.

### जळगाव परिमंडलात विद्यार्थांना मार्गदर्शन

जळगांव परिमंडलातील धुळे आणि नंदूरबारसह जळगांव जिल्ह्यांत विद्युत अपघात होऊ नयेत. यासाठी विद्युत उपकरणे व यंत्रणा हाताळण्यासंबंधी विद्युत कर्मचारी व ग्राहकांना मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यासाठी जनजागृती कार्यक्रम घेण्याची मोहिम राबविली जात आहे. परिमंडलात मुख्य अभियंता श्री. कैलास हुमणे यांच्या सुचनेप्रमाणे अधीक्षक अभियंता अनिल महाजन, कार्यकारी अभियंता धर्मेंद्र मानकर यांनी लघु प्रशिक्षण केंद्र जळगांवतर्फे जिल्ह्यात विविध शाळा, महाविद्यालयातून विद्युत सुरक्षा प्रशिक्षण मोहिम सुरु केली आहे. अनेक कनिष्ट व वरिष्ठ महाविद्यालयातून ग्राहक व विद्यार्थ्यांना विद्युत अपघात विरहित सेवा तसेच विद्युत उपकरणे व यंत्रणा हाताळण्यासंबंधी मार्गदर्शन करण्यात येत आहे. वीज सुरक्षेसंबंधीच्या प्रतिज्ञाही देण्यात आल्या. मोहिम यशस्वी करण्यासाठी उपकार्यकारी अभियंता श्री.जे.एस.महाजन व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### कोल्हापूर परिमंडलातील पन्हाळा येथे जनजागरण फेरी

कोल्हापूर परिमंडला अंतर्गत पन्हाळा येथे महावितरण व विद्युत निरीक्षक कार्यालय, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्युत सुरक्षा जनजागरण फेरी काढण्यात आली. पन्हाळ्यातील बाजीप्रभू देशपांडे यांचा पुतळा ते शिवाजी महाराज मंदिर असा फेरीचा मार्ग होता. सदर कार्यशाळेस कोल्हापूर ग्रामिण विभाग १ चे कार्यकारी अभियंता श्री. दीपक पाटील, विद्युत निरीक्षक श्री. शकील सुतार यांनी मार्गदर्शन केले. यात पन्हाळा, कोडोली व शाहूवाडी उपविभागातील जनमित्रांनी सहभाग नोंदविला. यशस्वितेसाठी उपकार्यकारी अभियंता श्री. रणजित पाटील यांनी परिश्रम घेतले. ■

## एलएलबी परिक्षेत डॉ. अविनाश आचार्य गुणवता श्रेणीत



**डॉ. अविनाश आचार्य**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने विधी शाखे अंतर्गत घेतलेल्या एलएलबी परिक्षेत डॉ. अविनाश आचार्य यांनी सरासरी ९.०९ श्रेणी अंक प्राप्त करीत गुणवत्ता यादीत स्थान पटकाविले आहे. डॉ. अविनाश आचार्य हे प्रादेशिक कार्यालयात वरिष्ठ व्यवस्थापक (मानव संसाधन – विधी) या पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या या यशाबद्दल वरिष्ठ व सहकार्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. ■

## वीज कर्मचाऱ्यांकडून धम्म बांधवांना भोजन व पुस्तिका वितरण

**६७ व्या** धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपूर येथील पवित्र दिक्षाभुमीला भेट देणाऱ्या धम्म बांधवांकरिता भोजनदान, राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याची माहिती देणारे पुस्तक व महावितरणच्या विविध योजना व सुविधांच्या माहिती पत्रकाचे नि:शुल्क वाटप महाराष्ट्र राज्य वीज वितरण, पारेषण व निर्मिती कंपनी मर्यादीत भोजनदान समितीतर्फे करण्यात आले.

यावर्षीच्या ६७ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त पवित्र दिक्षाभुमीवर आलेल्या संपूर्ण महाराष्ट्रातील धम्म अनुयायांना आपल्या गावी परत जाताना भोजनदान व राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याची माहिती देणारे पुस्तक तसेच महावितरणच्या योजना व सुविधा पत्रकाचे नि:शुल्क वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन नागपूरचे प्रादेशिक संचालक श्री. सुहास रंगारी यांचे हस्ते आणि नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. दिलीप दोडके, अधीक्षक अभियंता श्री. अजय खोब्रागडे, श्री. राजेश नाईक आणि कार्यकारी अभियंता श्री. हेमराज ढोके यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.



**धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त भोजनदान कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रादेशिक संचालक सुहास रंगारी व इतर मान्यवर.**

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. गौतम धोंगडे यांनी, प्रस्ताविक श्री. मधुकर सुरवाडे यांनी तर आभार प्रदर्शन श्री. भैय्याजी रेवतकर यांनी केले. ■

# महावितरणचे मोबाईल ॲप्स

**महावितरणने नवीन कनेक्शन ॲप, कर्मचारी मित्र ॲप, मीटर रीडिंग ॲप, मालमत्ता सर्वेक्षण ॲप, आरई ॲप (नवीकरणीय ऊर्जा) असे पाच मोबाइल ॲप हे कर्मचारी आणि कंत्राटी एजन्सीसाठी विकसित केलेले आहेत. हे ॲप अँड्रॉइड आणि आयओएस प्लॅटफॉर्मवर इंग्रजी आणि मराठीमध्ये उपलब्ध आहेत. आपण प्रत्येक महिन्यात यातील एका ॲपची माहिती जाणून घेणार आहोत.**

## नवीन कनेक्शन ॲप




मोबाईल ॲप कंपनी आणि कर्मचारी दोघांनाही अनेक दृष्टीने फायदेशीर आहे. यामध्ये चांगला संवाद, उत्पादकता, चांगले सहयोग, कर्मचाऱ्यांचा वाढता सहभाग, सुधारित ग्राहक सेवा आणि बरेच काही समाविष्ट आहे. जेव्हा कर्मचाऱ्यांना माहिती हाताळायची असते तेव्हा ते एका क्लिकने माहिती निवडू शकतात आणि हेच कर्मचारी ॲपचे वैशिष्ट आहे. या ॲपमुळे कर्मचाऱ्याचे कोणत्याही महत्त्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष होणार नाही. या ॲप्सच्या माध्यमातून कर्मचारी हा ग्राहक, ठिकाणे आणि कामाशी रिअल–टाईमने जोडला जातो. ऑनसाईट, घरी अथवा फिल्डवर असो, कर्मचाऱ्यांना कधीही डिस्कनेक्ट झाल्यासारखे वाटत नाही. कर्मचारी कुठेही असले तरीही त्याच्यासोबत संपर्क आणि उपलब्धता वाढवण्याचा हा एक सोयीस्कर मार्ग आहे. या ॲपमुळे कर्मचारी त्यांची कामे अधिक सक्षमपणे करू शकतात.

नवीन कनेक्शन ॲप हे मोबाइल ॲप नवीन मीटर जोडणी आणि मीटर व्यवस्थापनाशी संबंधित आहे. कर्मचारी तसेच एजन्सी खालील कार्यांसाठी हे ॲप वापरू शकतात.

**तांत्रिक शक्यता पडताळणी:** मंजूरी मिळाल्यानंतर नवीन कनेक्शन तांत्रिकदृष्ट्या शक्य आहे की नाही याची पडताळणी करण्यासाठी कर्मचारी ग्राहकाच्या स्थानाला भेट देतात.

**सौर तांत्रिक शक्यता पडताळणी:** ही सुविधा खास सौर छतावरील ग्राहकांच्या तांत्रिक व्यवहार्यतेसाठी देण्यात आली आहे.

**मीटर जोडणी:** मीटर क्रमांक, प्रारंभिक वाचन, मीटर रीडिंग फोटो, जिओ को–ऑर्डिनेट्स इत्यादी तपशील कॅप्चर करून नवीन कनेक्शन देता येते. त्याचवेळी इआरपी स्टॉक अद्यायावत करता येतो. 'पावती मंजूर' अशी स्थिती दर्शवत असलेले ग्राहक मोबाइल ॲपद्वारे नवीन मीटर जोडणीसाठी पात्र आहेत.

**मीटर बदलणे:** सदोष मीटर, ग्राहकांची विनंती अशा विविध कारणांसाठी मोबाईल ॲपद्वारे मीटर बदलता येते. येथे जुन्या आणि नवीन मीटरचे तपशील घेतले जातात जसे की मीटर क्रमांक, जुने आणि प्रारंभिक वाचन, जुने आणि नवीन मीटरचे फोटो, जिओ को–ऑर्डिनेट्स इ.

**विनामीटर ते मीटर:** या मेनूचा वापर मीटर नसलेल्या कृषी ग्राहकांचे मीटर ग्राहकामध्ये रूपांतर करण्यासाठी केला जातो.

**एचव्हीडीएस:** एचव्हीडीएस योजनेसाठी ॲपद्वारे एचव्हीडीएस प्रकल्प स्थिती सादर केली जाते.

**एचव्हीडीएस क्वालिटी चेक:** या मेनूचा वापर एचव्हीडीएस योजनेच्या काम च्या गुणवत्ता तपासणीसाठी केला जातो

**सौर प्रतिष्ठापन डेटा पडताळणी:** नॅशनल सोलर रूफटॉप पोर्टलद्वारे अर्ज केलेल्या ग्राहकांच्या इंस्टॉलेशन डेटाची पुष्टी करण्यासाठी कर्मचारी हा पर्याय वापरू शकतात. ■

---

### 'इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स'द्वारे आयोजित सतराव्या एनर्जी समीटमध्ये

# महावितरणचा 'ग्रीन एनर्जी' पुरस्काराने सम्मान

**दिल्ली** येथे ICC (इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स) यांनी आयोजित केलेल्या सतराव्या एनर्जी समीटमध्ये महावितरण कंपनीला ग्रीन एनर्जी अवार्डने सम्मानित करण्यात आले. या दरम्यान 11th Innovation with Impact Awards for DISCOMs २०२३ पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. महावितरणसह देशातील एकूण २६ वीज कंपन्यांनी विविध श्रेणीतील पुरस्कारांसाठी नामांकन सादर केले होते.

या पुरस्कारांसाठी एकूण हरित ऊर्जा, कार्यक्षम संचलन, ग्राहकसेवा आणि ग्राहक सक्षमीकरण, तंत्रज्ञानाचा स्वीकार, कार्यक्षमता सुधार, आणि प्रभावासह नवीनता अशा सहा श्रेणी करण्यात आल्या होत्या. यापैकी हरित उर्जा या क्षेत्रात (रुफ टॉप सोलर, सौर वाहिनी, ई वाहन धोरण, अपारंपरिक उर्जा जागृती इ.) भरीव कामगिरी केल्याबद्दल महावितरण कंपनीला तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. या कार्यक्रमाला मुख्यालयातील मुख्य अभियंता (अपारंपरिक ऊर्जा) श्रीमती कविता घरत, अधीक्षक अभियंता(TRC) श्री. मिलिंद दिग्रसकर, तसेच मुंबई, ठाणे, भांडूप आणि पुणे येथील अभियंते देखील उपस्थित होते. ■



पुरस्कार स्विकारताना मुख्य अभियंता (अपारंपरिक ऊर्जा) श्रीमती कविता घरत.

Printed & Published by Shri. Bharat Pawar of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd. Printed at Jyotirling Enterprises, 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 2300 2574 & Published at Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक : श्री. भारत पवार उपसंपादक : श्री. विश्वजीत भोसले
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता
प्रकाशगड, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)